REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १३ जुलै, १९३८ अंक २८

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.

नोटीस

या बँकेच्या सन १९३८-३९ सालच्या हिशेबांची तपासणी करण्यासाठी येत्या वार्षिक साधारण सभेनें हिशेब तपासनिसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर जागेसाठी ज्यांस उमेदवार म्हणून उभे रहावयाचे असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेचे पुणें कचेरींत तारीख ३० जुलै, १९३८ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वीं दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत. अर्जदार हा बँकेचा भागीदार असला पाहिजे. उमेदवारानें अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावी.

पुणें शहर
ता. १० जुलै, १९३८

द. दि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर.

नोटीस

या बँकेच्या सन १९३८-३९ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी व्यक्तिशः मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा कचेरींत नोटीस बोर्डावर निवडणुकीचा नियम नं. ३ प्रमाणें लाविली आहे. तरी निवडणूकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवारांच्या लेखी संमतीनें ता. ९ ऑगस्ट, १९३८ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वीं बँकेच्या पुणें कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावींत. सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीच्या वेळांत चौकशी करावी म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर
ता. १० जुलै, १९३८

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

मराठी केन्द्र संस्था, पुणें

उन्हाळ्यानंतर १५ जून रोजीं सुरू झाली. यंदापासून मॅट्रिक नापास आणि नोकरी करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बँकिंग आणि अकौंटन्सी या विषयांचे डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू केले आहेत. शिक्षक वर्ग पदवीधर व अनुभवी असा असून परगांवच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुंदर सोय केली आहे. जास्त माहितीकरितां माहितीपत्रक मागवा.

आचार्य,
मराठी केन्द्र संस्था.
२९२ सदाशिव पेठ, पुणें.

TENDER NOTICE

Sealed tenders on item rate basis are invited for the proposed Head Office Buildings at Poona for The Commonwealth Assurance Co., Ltd., estimated to cost over Rs. 1,25,000/-. Tender forms can be had from the office of the Company during office hours on payment of Rs. 5/-. An earnest money of Rs. 1,000/- only should accompany each tender. Tenders should reach the office of the Company at or before 5 p. m. on 25th July 1938.

11, Budhwar,
Poona 2,
5-7-38.

By order of the Board,
R. N. Abhyankar,
Managing Agent.

दे. भ. लोकनायक माधव श्रीहरी अणे व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनकिरतां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शाखाचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.
(हेड ऑफिस : जळगांव)

माहिती मागवा

चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २

विविध माहिती

शिकविलेलीं वानरें—सरकारी नोकर

मलाया देशांतील वन्य वनस्पतींचे नमुने जमा करण्याचे कामीं कांहीं वानरांचें उत्कृष्ट सहाय होत आहे. त्यांची हुषारी पाहून सरकारनें त्यांस ह्या कामाकरितां योजिलें आहे आणि त्यांची रहाण्याची सोय सिंगापूर येथील प्राणिसंग्रहालयांत स्वतंत्र केली आहे. ह्या वानरांस मनुष्याच्या बोलण्याचा अर्थ शिकवि-ण्यांत येतो त्यामुळें "वर जा; खाली ये; ती फांदी ओढ; आणखी आण; वाटेंत फांदी अडकली आहे ती सोडव" इत्यादि सूचनांनुसार तीं कामें करतात. नारळ काढण्याचे कामीं वानरांचा उपयोग सुप्रसिद्धच आहे.

ज्यू लोकांस अमेरिकेंत थारा

जर्मनीमध्यें हिटलेरच्या नेतृत्वाखाली ज्यू लोकांच्या छळास जोरानें प्रारंभ झाला, तेव्हांपासून दरमहा सरसरीनें १,१०० ज्यू जर्मनींतून अमेरिकेंत जात आहेत. १९३३ सालापासून आतां-पर्यंत ५५ हजार ज्यू लोकांस अमेरिकेंत थारा मिळाला आहे.

जागतिक शांतीसाठीं युद्धाची तयारी

ग्रेटब्रिटननें तुर्कस्तानला सुमारें ८ कोटि रुपये कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. तुर्कस्ताननें ह्या पैशांतून ग्रेटब्रिटनमध्यें युद्धो-पयोगी माल खरेदी करावयाचा आहे. जगांत शांतता नांदावी ह्या उच्च हेतूनें प्रेरित होऊनच ह्या दोन राष्ट्रांनीं वरील प्रकारचा करार केला आहे, असें ब्रिटिश फडनवीस, सर जॉन सायमन, ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

सर रॉबर्ट बेल पगारी अध्यक्ष म्हणून येत नाहींत

बॉंबे फायर, ॲक्सिडेंट ॲन्ड अंडररायटर्स इन्शुअरन्स असो-सिएशनचे पगारी अध्यक्ष म्हणून काम करण्याचें, मुंबई प्रांताचे एक माजी हंगामी गव्हर्नर, सर रॉबर्ट बेल, ह्यांनीं कबूल केलें होतें. या नेमणुकीच्या अनिष्टतेसंबंधीं बरीच चर्चा झाली होती. आतां सर रॉबर्ट बेल ह्यांनीं अध्यक्षपद स्वीकारण्यास अमान्यता दर्शविली आहे.

ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा उतरता दर

तारीख	रकम (रु.)	पडलेला व्याजाचा दर %		
		रु.	आ.	पै
७–६–३८	१ कोटि	१	६	०
१४–६–३८	१ कोटि	१	४	०
२१–६–३८	१ कोटि	१	२	३
२८–६–३८	१ कोटि	१	०	८
५–७–३८	१½ कोटि	०	१५	४

तागाच्या गिरण्यांचें फाजील उत्पादन

तागाच्या गिरण्यांचें उत्पादन जरूरीपेक्षा जास्त होत आहे, त्यास आळा घालण्याची मध्यवर्ती सरकारास विनंति केली जाणार आहे. गिरण्यांचा आपापसांत सलोख्याचा करार होऊन रात्रपाळी थांबविण्यांत आली, तर हा प्रश्न लवकर सुटेल असें म्हणतात.

डब्यांच्या खरेदीसाठीं ३ कोटि, ८४ लक्ष रुपये

येत्या वर्षी उतारूंचे व मालाचे डबे खरेदी करण्याकरितां ३ कोटि, ८४ लक्ष रुपयांची मागणी हिंदी रेल्वेजच्या फिनॅन्स कमिटीकडे करण्यांत आली आहे.

पेट्रोलचा शोध

फ्रान्समध्यें पेट्रोलचा शोध करण्यासाठीं जमीन खणून पहा-ण्याकरितां फ्रेंच सरकारनें ४५ लक्ष रुपये मंजूर केले आहेत.

प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांस मोफत दूध

मुंबई कॉर्पोरेशनच्या नियंत्रणाखालील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ८० हजार आहे, त्यांपैकीं शेकडा २० मुलांचे प्रकृतीवर पौष्टिक अन्नाच्या अभावाचा दुष्परिणाम दिसून येतो. अशा मुलांस शाळेच्या दिवशीं दररोज ६ औंस दूध दिलें असतां प्रत्येक वर्षी एकूण ३ लक्ष, ८५ हजार शेर दूध लागेल व त्यास सुमारें १¼ लक्ष रुपये खर्च येईल, असा हिशेब मुंबईच्या म्युनि-सिपल कमिशनरनीं केला आहे.

ग्रेटब्रिटनमध्यें मोटारींच्या धंद्याचें महत्त्व

ग्रेट ब्रिटनमधील मोटारींच्या उत्पादनावर त्या देशांतील सुमारें १३ लक्ष लोकांचा चरितार्थ अवलंबून आहे. ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा एक अकरावा अंश ह्या धंद्यापासून मिळतो.

विमानांचें उत्पादन कठीण कां?

"मोटारीच्या बनावटींत सुमारें १,७०० सुटे भाग असतात. विमानांचे बनावटींत ७० हजारांवर असतात. ह्या कारणानें विमा-नांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर करणें मोटारींच्या उत्पादनापेक्षा कठीण असतें" अशी माहिती ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चेंबर्लेन, ह्यांनीं कॉमन्स सभेंत दिली.

आगबोटींच्या वहातुकीमधील ब्रिटिशांचें स्थान

"मुंबई आणि पूर्वेकडील इतर बंदरें ह्यांमध्यें चालणाऱ्या वहातुकींतील ब्रिटिश आगबोटींचा हिस्सा शेकडा ८० इतका होता तो आतां शेकडा २० वर येऊन ठेपला आहे. पॅसिफिक महासागरांतील वहातुकहि ब्रिटिशांचे हातांतून निसटली आहे" असे मुंबईचे माजी गव्हर्नर, लॉर्ड लॉइड, हे एका भाषणांत म्हणाले.

जपानशीं रोखीनें व्यवहार करा

ह्या आशयाचा सल्ला अमेरिकन अधिकाऱ्यांनीं आपल्या व्यापाऱ्यांस दिला आहे, असें समजतें.

मुंबई शहरांतील वाढती मृत्युसंख्या

१९३८ च्या पहिल्या तिमाहींत मुंबई शहरांत एकूण १०,५०८ लोक मरण पावले. १९३७ च्या तत्सम मुदतींमधील मृत्युसंख्या ७,१९५ होती.

चेक्सची देवघेव

बॉंबे बॅंक्स क्लिअरिंग हौसमध्यें १ जुलै अखेर संपलेल्या आठ-वड्यांत १७ कोटि, ९९ लक्ष रुपयांच्या ९१,६६४ चेक्सची देवघेव झाली.

कालव्याचे पाण्याखालील जमीन

सबंध हिंदुस्थानांत मिळून ३ कोटि, १० लक्ष एकर जमीन कालव्याचे पाण्याखाली आहे, त्यापैकीं १ कोटि, १० लक्ष एकर एकट्या पंजाबांत आहे. मद्रास प्रांतांत ७५ लक्ष एकर जमी-नीस कालव्याचें पाणी मिळतें. मुंबई प्रांतांत फक्त ३ लक्ष, ८२ हजार एकरांतील पिकें कालव्याचे पाण्यावर होतात.

मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

	किंमत रुपये
२६-६-३८ ते २-७-३८	४४,४३,०००
३-७-३८ ते ९-७-३८	३६,५६,७५४
२१-९-३१ ते ९-७-३८	३,१६,०२,०१,९०१

अनुक्रमणिका

पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ... ३३८		४ दि. बँक ऑफ इंडिया लि. ३४२
२ खंडकऱ्यांविषयीं प्रांतिक कायदा ३३९		५ कारखान्यांतील एकत्रीकरणाची आवश्यकता ३४३
३ स्फुट विचार ३४०		६ संरक्षण कमी होणार ३४३
सहकारी इन्स्टिट्यूटची पुनर्घटना-आणखी पछिहाट-पछेहाट कशी होत आहे?--नामधारी इन्स्टिट्यूट-राष्ट्रगीताचा वाद-बेकारांस बेकार-मराठी केंद्र संस्था.		७ कातडें कमविण्याची-क्रोम पद्धति... ... ३४४
		८ सहकारी चळवळ ... ३४५
		९ विमा कंपनीविरुद्ध निवाडा ३४५
		१० वेस्टर्न इं. कंपनीची वार्षिक सभा ... ३४६
		११ निवडक बाजारभाव... ३४७

अर्थ

बुधवार, ता. १३ जुलै, १९३८

खंडकऱ्यांविषयीं प्रांतिक कायदा

मुंबईच्या प्रधान मंडळानें सामान्य जनतेची, विशेषतः शेतकरी वर्गाची, स्थिति सुधारण्याचे हेतूनें कांहीं बाबतींत कायदे करण्याचें योजिलें आहे, त्यांमध्यें खंडानें जमीन करणाऱ्या कुळांस विशिष्ट सवलती देण्यासंबंधाची व्यवस्था ही बाब विशेष महत्त्वाची आहे. नियोजित कायद्याचा मसुदा अजून बाहेर पडलेला नाहीं आणि तो बहुतेक तयारहि झालेला नसेल. तथापि, काँग्रेस घटनेंतले कांहीं प्रतिनिधी आणि मंत्री यांच्या पुणें येथें नुकत्याच भरलेल्या सभेंत ह्या विषयाची चर्चा झाली तिच्या स्वरूपाची माहिती बाहेर आली आहे, तीवरून प्रधान मंडळ आणि काँग्रेसमधले कित्येक पुढारी ह्यांच्या डोक्यांत प्रस्तुत विषयासंबंधानें कोणते विचार घोळत आहेत, ह्याची कल्पना येते. तयार होऊं घातलेल्या बिलांत अंतर्भूत व्हावयाच्या तत्त्वाची परिस्फुटता झाल्याकारणानें त्यावर विघातक आणि निषेधक टीका होणें स्वाभाविक आहे. ह्या विषयाची चर्चा करण्यासाठी प्रांतिक असेंब्लीमधील काँग्रेस पक्षीय सभासदांची सभा लवकरच भरण्याचें ठरलें आहे. तीमध्यें साधकबाधक मुद्यांचा उहापोह होईल, ह्यांत शंका नाहीं. त्या पूर्वीच सदरहु बाबतींत सभांतून व वर्तमानपत्रांतून लोकमत प्रसिद्ध होत आहे, ही गोष्ट इष्टच आहे. नियोजित कायद्याची रूपरेखा आखली जाण्यापूर्वी त्याचा मुख्य उद्देश निश्चित होणें आणि तो साध्य व्हावा म्हणून परिणामकारक तजवीज कायद्यांत केली जाणें अगत्याचें आहे. समाजाच्या आर्थिक सुस्थितीच्या दृष्टीनें जमिनींचे मालक आणि खंडकरी ह्यांच्या जीवनावर आणि त्याचप्रमाणें शेतीच्या धंद्यावर कायद्याचे परिणाम काय होतील ह्याचा काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे. कायद्याच्या अंमलबजावणींत काय भानगडी उपस्थित होतील आणि त्यांचे योगानें नवीन योजना विफल होण्याचा संभव आहे कीं काय ह्या गोष्टींची कल्पनाहि स्पष्ट येणें आवश्यक आहे. सरकारास काय साध्य करावयाचें आहे आणि नियोजित कायद्याच्या मार्गानें तें कसें फलद्रूप होणार ह्याची चांगली शहानिशा झाल्यावांचून नुसत्या ध्येयाची घोषणा केल्यानें कार्यभाग होणार नाहीं.

"टेनन्सी" कायद्यांचा उद्देश आणि मुंबई प्रांत

खंडानें जमीन करणाऱ्या शेतकऱ्यांस आपल्या धंद्यांत स्थायिकपणा वाटावा आणि आपल्या श्रमाचें चीज होत आहे ह्या निश्चितीनें त्यांचा योगक्षेम नीट चालून शेतीच्या धंद्यास ऊर्जितावस्था यावी व अप्रत्यक्षपणानें समाजाचें आर्थिक हित व्हावें हा खंडकऱ्यांविषयींच्या नियोजित प्रांतिक कायद्याचा हेतु असला पाहिजे. बंगाल, बहार, संयुक्तप्रांत इत्यादि भागांत जमीनदारी पद्धतीची जमीनधाऱ्याची पद्धति दृढमूल झालेली असून तेथें खंडकऱ्यांच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठीं तपशीलवार कायदेहि झालेले आहेत. एकंदरीनें पहातां हिंदी शेती आणि शेतकरी ह्यांच्या दुःस्थितीच्या निवारणाकडे सरकारचें आजपावेतों जावें तसें लक्ष गेलेलें नाहीं. अलीकडे लोकशाहीची प्रगति झपाट्यानें होत असल्यानें आणि प्रांतिक विधिमंडळांत जनतेच्या प्रतिनिधींच्या हातीं बरीचशी खरीखुरी सत्ता आल्यानें हा प्रश्न जिव्हाळ्याचा बनला आहे हें सर्वथा योग्य आहे. काँग्रेसनें शेतकरी आणि खेडेगांवें ह्यांच्या उन्नतीचा प्रश्न प्रामुख्यानें हातीं घेतला आहे आणि ह्याच कारणानें सावकारी नियंत्रणें, खंडकऱ्यांचें संरक्षण, कर्ज निवारण इत्यादि बाबींच्या चर्चेस महत्त्व प्राप्त झालें आहे. अलीकडच्या आर्थिक मंदीनें तर ह्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचें अगत्य द्विगुणित केलें आहे, आणि ह्यामुळेंच प्रांतिक प्रधान मंडळांनीं ते सोडवण्याचें कार्य तातडीनें हातीं घेतलें आहे. बंगाल वगैरे प्रांतांतल्या जमीनदारी पद्धतीसारखी पद्धति, कांहीं अपवाद सोडतां, मुंबई इलाख्यांत अस्तित्वांत नाहीं. ह्या कारणानें, तिकडे "टेनन्सी" कायदे आहेत, म्हणून केवळ येथेंहि तसा कायदा असावा ही कल्पना मुळांतच टाकून दिली पाहिजे. दुसरीकडची कायद्याची आणि इतर व्यवस्था पाहून आपलेकडेहि त्याची नक्कल उठवून देण्याचा मोह कित्येक सद्धेतुप्रेरित ध्येयवादी आणि आस्थेवाइक राजकारणी कार्यकर्त्यांस होण्याचा नेहमी संभव असतो. खंडकऱ्यांसारख्या एखाद्या वर्गाच्या हिताचें संरक्षण करण्याचें राज्यकर्त्यांनीं योजिलें असतां आपल्या हक्कांची पायमल्ली होत आहे, असें जमिनीच्या मालकांस वाटण्याची भीति त्याबरोबरच उत्पन्न होते. ह्यासाठीं मुंबई इलाख्यांत टेनन्सी कायदा कर्तव्य असतां जिच्यावर तो आधारला जाणार त्या वस्तुस्थितीची तपशीलवार माहिती गोळा करून ती प्रसिद्ध करणें राज्यकर्त्यांचें कर्तव्य ठरतें. असें झालें असतां समाजांतील विचारी लोकांस असल्या वादग्रस्त प्रश्नांबाबत स्वतःचें स्वतंत्र मत बनवण्यास सहाय होतें.

प्रांतिक वस्तुस्थिति काय आहे?

वरील बाबतींत माहिती अत्यावश्यक आहे, ती अशीः-(१) मुंबई इलाख्यांत जमिनींचे मालक कोणत्या पेशाचे आहेत आणि त्यांचे खंडकरी कोण आहेत? (२) जमीन मालकांत पिढीजात शेतकरी किती आहेत आणि किती खंडकऱ्यांच्या स्वतःच्या जमिनी आहेत? (३) जमीन मालक आणि खंडकरी ह्यांचे परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे आहेत? (४) खंडाच्या रकमा डोईजड व अन्यायकारक आहेत काय? (५) जमीन मालकांस खंड वेळेवर आणि पुरा मिळतो काय? (६) मिळत नसल्यास त्याबाबत काय तजवीज होते? (७) खंडकऱ्यांस मालक काढून टाकतात काय? असें करण्याचीं त्यांचीं कारणें कोणतीं? (८) पिढीजाद शेतकऱ्यांचे हातून त्यांच्या मालकीचीं शेतें, बिगर शेतकरी लोकांच्या हातीं जाण्याची प्रवृत्ति दिसते,

तिचीं कारणें कोणतीं आणि तीं दूर करण्याचे मार्ग कोणते आहेत? (९) शेताच्या निगेची पर्वा न करणारे बिगर शेतकरी मालक किती आहेत? (१०) उपजीविकेचें साधन म्हणून जमीनींत पैसा घालून ती खंडानें देणारे मालक किती आहेत आणि त्यांच्या हातून शेतीच्या सुधारणेचे प्रयत्न होतात काय? (११) खंडकऱ्यांस त्यांच्या खंडाची व खंडकरीपणाची शाश्वती कायद्यानें करून दिली असतां, जमीनीच्या सुधारणेस लागणारें भांडवल त्यांस उपलब्ध होऊन ते तिची निगा नीट राखतील काय? (१२) नियोजित कायदा अमलांत आल्यास जमीन मालकांचें लक्ष शेतीच्या सुधारणेकडे लागेल काय? (१३) कायद्यामुळें कज्जे वाढतील काय? त्यामधून निसटून तो निष्फळ करण्याचे प्रयत्न होणें शक्य आहे काय? (१४) शेती आणि शेतीची सुधारणा ह्यांस नवीन कायद्याचें सहाय कितपत होईल? (१५) लहान शेतांचे मालक शेतकरी आहेत, त्यांस कायद्याची आवश्यकता भासत आहे काय?

सामाजिक हितासाठी व्यक्तींचा स्वार्थत्याग –

ह्या आणि असल्या इतर मुद्यांसंबंधाची माहिती उपलब्ध होईल तर नियोजित कायद्याचें परीक्षण व्यवस्थित रीतीनें होऊं शकेल. कोणत्याहि सुधारणेस विरोध हा होणारच. जमीन मालकांस आपले हक्क मर्यादित होणें कसें आवडेल? परंतु एखादी योजना सर्व समाजाच्या किंवा बहुसंख्य पण असहाय वर्गाच्या हिताची असल्यास तिच्याप्रीत्यर्थ कांहीं लोकांस स्वार्थत्याग करावा लागला तर तो केला जाणें प्राप्त आहे. तथापि, सदरहु योजना अशा रीतीनें समाजहितवर्धक असून अगत्याची आहे आणि तिच्या जागीं दुसरी व्यवस्था करणें शक्य नाहीं, हें प्रथम सिद्ध झालें पाहिजे. योजलेल्या कायद्यामुळें उपस्थित होणाऱ्या अडचणी दूर करण्याची तरतूदहि वेळींच होणें आवश्यक आहे. जमीन मालकीच्या कल्पनेचीं मुळें इकडील समाजाच्या घटनेंत खोल गेलेलीं आहेत. त्यांस धक्का देतांना सावधगिरी बाळगावी तितकी थोडी आहे. परंतु शेकडो वर्षें चालत आलेल्या पद्धतींत मुळींच फरक होतां कामा नये असा आग्रह कोणी धरून चालावयाचें नाहीं. बदलणाऱ्या परिस्थितींत कार्य-व्यवस्थेंत योग्य वाटणारे फरक झालेच पाहिजेत आणि ते समाजाच्या जिवंतपणाचें लक्षण समजले जातात. मात्र, अशा रीतीची सुधारणा ढोबळपणाची आणि व्यावहारिक स्वरूपाची असली पाहिजे.

सबंध हिंदुस्थानांत एकजात वजनमापें?

हिंदुस्थानच्या मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंतील बाबी कोणत्या आणि प्रांतिक सरकारच्या कक्षेंतील बाबी कोणत्या, ह्याचा नवीन घटना कायद्यांत उल्लेख आहे. कांहीं बाबींसंबंधीं दोहोंसहि कायदे करण्याचा अधिकार आहे. ह्या अधिकाराच्या उपयोगासंबंधीं वाद निघाल्यास मध्यवर्ती सरकारचा कायदा ग्राह्य समजला जाईल, अशी कायद्यांत तरतूद आहे. वजनमापांचा प्रश्न ह्याच कोटींतील आहे. कांहीं प्रांतांनीं ह्या बाबत कायदे केलेले आहेत. सबंध हिंदुस्थानांत एकजात वजनमापें अस्तित्वांत आणण्याकरितां हिंदुस्थान सरकार मध्यवर्ती असेंब्लींत आतां बिल मांडणार आहे. हीं वजनमापें रेल्वेजवरील सध्यांच्या वजनमापांच्या नमुन्याप्रमाणें निश्चित केलीं जातील, असें समजतें.

स्फुट विचार

सहकारी इन्स्टिट्यूटची पुनर्घटना—आणखी पीछेहाट

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या पुनर्घटनेच्या बाबतींत भणसाळी-मेथा रिपोर्टांत करण्यांत आलेल्या शिफारसी पार्श्वगामी स्वरूपाच्या आहेत असें सहकारी कार्यकर्त्यांचें निश्चित बहुमत झाल्यानें ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळाची एक कमिटी नेमण्यांत आली होती. ह्या संबंधांतील सरकारी ठरावाचा आधार घेऊन त्यास शक्य तितकी जुळती अशी त्या कमिटीनें पुनर्घटनेची एक योजना तयार केली. इन्स्टिट्यूटला केवळ शिक्षण-संस्था न बनवतां सध्याप्रमाणें त्याचें कार्यक्षेत्र सरकारनें व्यापक राहूं द्यावें अशी व्यवस्था त्या योजनेंत अंतर्भूत केली होती. ती योजना अर्थातच "अर्धं त्यजति पंडितः" ह्या न्यायानें बनवलेली व तडजोडीच्या स्वरूपाची होती. तिची चर्चा इंस्टिट्यूटच्या कौन्सिलच्या सभेंत झाली आणि योजना व चर्चेंत प्रदर्शित झालेले साधक-बाधक विचार मंत्र्यांचे पुढें मांडण्यासाठी तिनें एक शिष्टमंडळ नेमलें. मंत्र्यांशीं झालेल्या वाटाघाटींत कित्येक बाबींचा निर्णय झाला, त्यांपैकीं दोन-तीन अत्यंत महत्त्वाच्या आहेत, त्यांचा निर्देश येथें करून त्यांकडे सहकारी कार्यकर्त्यांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. हा निर्णय इन्स्टिट्यूटला संमत आहे असें सरकारनें गृहीत धरून त्याबाबत साधारण सभेची मान्यता आपणांस विलंब न करतां कळवण्यांत यावी अशा अर्थाचें पत्र इन्स्टिट्यूटकडे पाठविलें आहे असें समजतें. कार्यकारी मंडळ वरील निर्णयाच्या आणि सरकारच्या पत्राचा विचार करीलच. तथापि, शिष्टमंडळानें मान्य केलेले निर्णय कार्यकारी मंडळाच्या घटना-समितीच्या योजनेस किंवा कौन्सिलनें व्यक्त केलेल्या मतास धरून नाहींत असें वाटतें आणि त्यांचे योगानें प्रगतीचे ऐवजी पीछेहाट होत आहे असें दिसतें. "विनायकं प्रकुर्वाणः रचयामास वानरम्" सारखा प्रकार प्रस्तुत प्रकरणीं होत आहे कीं काय अशी भीति वाटत असल्यानें त्याची वेळींच चर्चा होणें अगत्याचें आहे.

पीछेहाट कशी होत आहे?

इन्स्टिट्यूटच्या स्वतंत्र शाखा जिल्हानिहाय असण्याचें कारण नाहीं, त्यानें आपलें शिक्षणाचें व प्रचाराचें मर्यादित कार्य जिल्हा सुपरव्हिजन बोर्डाचे प्रतिनिधी आंत असलेल्या उपसमित्यांच्या मार्फत करावें अशी भणसाळी–मेथा रिपोर्टाची सूचना होती. इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळाच्या घटना-समितीनें असें सुचवलें होतें कीं शिक्षण-प्रचार कमिटी प्रत्येक जिल्ह्यांत स्वतंत्र असावी आणि ती प्रातिनिधिक स्वरूपाची परंतु प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळानें नेमलेली असावी आणि तिचा चिटणीस इन्स्टिट्यूटचा व तिला जबाबदार असलेला एज्युकेशन इन्स्पेक्टर हा असावा. भणसाळी–मेथा कमिटीचा रिपोर्ट आणि इन्स्टिट्यूटच्या घटनासमितीची योजना ह्या दोहोंमध्यें नुसतें शिक्षणाचें काम कां होईना, पण तें प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या पूर्णपणानें ताब्यांत असावें आणि शिक्षण-इन्स्पेक्टर जिल्ह्यामध्यें इन्स्टिट्यूटकडून नेमला जावा व सर्वस्वी इन्स्टिट्यूटच्या नियंत्रणाखाली त्याचें काम चालवें अशी स्पष्ट तजवीज होती. इन्स्टिट्यूटच्या शिष्टमंडळानें सुपरव्हायझिंग यूनिअन्सच्या जिल्हा बोर्डाचें शैक्षणिक कार्य "प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या नियंत्रणखालीं" चालण्या-

विषयींची सवलत सरकारकडून आपण मिळवीत आहों ह्या समजुतीनें वरील स्वतंत्र अधिकारावर पाणी सोडलें आहे असें दिसतें. शिक्षण आणि प्रचार ह्यांच्या दोन लहान खोल्या कां होईनात, पण पहिल्या दोन योजनांस अनुसरून इन्स्टिट्यूटच्या पूर्ण मालकीच्या होत्या. त्या टाकून देऊन लहान भाड्याच्या घरांत रहाण्याचें शिष्टमंडळानें मान्य केल्यासारखें होत आहे. मंडळ आणि मंत्रि ह्यांचेमध्यें ठरलेल्या योजनेंत जिल्हाबोर्डाचें शैक्षणिक कार्य प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या नियंत्रणानें चालावें असें म्हटलें आहे खरें, पण हें नियंत्रण केवळ नांवाचें राहून सर्व सत्ता बोर्डाचे स्वाधीन करण्यांत येणार ही गोष्ट शिष्टमंडळांतल्या दिवाणबहादुरद्वयांच्या लक्षांत कशी आली नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें. मंडळ आणि मंत्री यांचा परस्परांच्या मनांतील कल्पनांविषयीं गैरसमज होणें शक्य आहे असें म्हणावें लागतें.

नामधारी इन्स्टिट्यूट

प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या जिल्हा शाखा किंवा जिल्हा बोर्डाच्या शिक्षण कमिट्या ह्यांच्या ऐवजी ह्या बोर्डानींच प्रत्यक्ष आणि सुटसुटीतपणानें इन्स्टिट्यूटचें सर्व काम करावयाचें असें एकदां ठरलें म्हणजे सर्व सत्ता बोर्डाच्या हातीं जाऊन इन्स्टिट्यूटवर हवेमध्यें " नियंत्रण " चालवीत रहाण्याची पाळी येणार ह ओघानेंच प्राप्त होतें. ह्या बाबतींत सरकारची सध्याची भूमिका स्पष्ट दिसते. जिल्हा बोर्डाकडे शिक्षणाचें व प्रचाराचें काम सोपवल्यामुळें शिक्षण-इन्स्पेक्टर्स त्यांनींच नेमावयाचे असून सर्वस्वी त्यांच्याच अधिकाराखालीं त्यांनीं वागावयाचें आहे. मग, प्रांतिक इन्स्टिट्यूटला सरकारी शिक्षण ग्रँट मिळण्याचें कारण उरत नाहीं. काय ग्रँट द्यावयाची ती सरकार जिल्हा बोर्डासच देईल. जिल्हा बोर्ड शिक्षणाची व्यवस्था करणार, तेंच शिक्षण-इन्स्पेक्टर्स नेमणार आणि त्यांच्यावर अधिकार चालवणार आणि तेंच सरकारकडून ग्रँट घेणार. आतां, ह्या व्यवस्थेंत प्रांतिक इन्स्टिट्यूटचा दर्जा राहिला कोठें व तें शिक्षणाचें कार्य करणार कसें ? अभ्यासक्रम व पुस्तकें निश्चित करून त्यानें स्वस्थ बसावें. लोकांच्या तक्रारी आणि सूचनाहि जिल्हा बोर्डानीं परस्पर सहकारी खात्याकडे पाठवण्यास मुभा आहे. प्रांतिक इन्स्टिट्यूटनें, बोर्डाची मर्जी लागल्यास, पोस्ट ऑफिसचें काम करावें. ह्या रीतीनें, प्रांतिक इन्स्टिट्यूटला काम नाहीं, नोकर नाहींत, सरकारी ग्रँट नाहीं. जिल्हा बोर्डावरचें "नांवाचें नियंत्रण" तेवढें राहिलें. शिष्टमंडळानें ही आपत्ती लक्षांत न येऊन पत्करलेला भातुकलीचा खेळ इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळास व कौन्सिलास पसंत पडेल असें वाटत नाहीं. त्यांनीं आपलें म्हणणें सरकारास स्पष्टपणें कळवलें पाहिजे आणि शिष्टमंडळानेंहि आपली भूमिका सहकारी कार्यकर्त्यांपुढें मांडली पाहिजे. ह्या बाबतींत शिष्टमंडळाचा किंवा सरकारचा गैरसमज झाला असल्यास त्याचें निराकरण झालें पाहिजे. शिष्टमंडळास सरकारची बाजू समाधानकारक आहे असें वाटत असल्यास तिचें समर्थन मंडळानें करून सहकारी कार्यकर्त्यांचें मन स्वत:कडे व सरकाराकडे वळवणें आवश्यक आहे. शिष्टमंडळाच्या मनांत एक होतें आणि मंत्र्यांच्या मनांत दुसरेंच होतें असा प्रकार प्रस्तुत प्रकरणांत झाला असण्याचा पुष्कळ संभव आहे. किंवा, इन्स्टिट्यूटकडे " सर्वसाधारण नियंत्रण " राहिलें असतां प्रत्यक्ष व्यवहारांत तें कार्यहीन आणि सत्ताहीन होण्यापर्यंत मजल जाईल अशी कल्पना शिष्टमंडळास आली नसावी. तें कांहींहि असलें तरी सध्या उपस्थित झालेली परिस्थिति त्यास मान्य होईल असें वाटत नाहीं. नवीन घटनेचा विपरीत परिणाम मंत्र्यांचे नजरेस आणला गेल्यास तीमध्यें आवश्यक असलेली दुरुस्ती घडून येण्यास अडचण पडूं नये.

राष्ट्रगीताचा वाद

दक्षिण आफ्रिका हा ब्रिटिश साम्राज्याचा महत्त्वाचा भाग आहे. चाळीस वर्षांमागें तेथील बोअर आणि इंग्रज ह्यांचेमध्यें युद्ध होऊन ब्रिटिश फौजांनीं जय मिळवला. परंतु शेवटीं त्या देशास राजकीय स्वातंत्र्य देण्यांत आलें आणि तो कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादि ब्रिटिश वसाहतींच्या बरोबरीनें तें भोगीत आहे. त्यांतले इंग्लिश व बोअर वंशाचे नागरिक एकाच राज्यघटनेंत सारखेच नांदत आहेत, तथापि मधून मधून त्यांचा स्ववंशाभिमान तीव्रतेनें प्रकट होत असतो. तेथें एक लष्करी समारंभ नुकताच झाला, त्या प्रसंगीं बोअर राष्ट्रगीत म्हणण्यांत आलें. ह्या योगानें इंग्रज नागरिकांमध्यें खळबळ उडून प्रधान मंडळाच्या एका सभासदानें राजीनामा दिला. प्रकरण ह्या रीतीनें विकोपास जाऊं लागल्यानें तें शेवटीं तडजोडीनें मिटविण्यांत आलें. सरकारच्या नियमानें औपचारिक स्वरूपाचे समारंभ होतील तेव्हां इंग्रजांचें किंवा बोअरांचें राष्ट्रगीत एकटेंच म्हणण्यांत येऊं नये; एका बरोबर दुसरेंहि म्हटलें जावें अशा प्रकारची ही तडजोड आहे. लोकशाहीच्या घटनेंत भावना आणि व्यवहार ह्यांचा मेळ घालण्याचें महत्त्व दक्षिण आफ्रिकेंतील ह्या उदाहरणावरून स्पष्ट होत आहे. त्या देशांत आणि कॅनडामध्यें भिन्न भिन्न वंशाचे आणि एका काळीं परस्पर शत्रु असलेले लोक समान नागरिकत्वाचे हक्क एकत्र उपभोगीत आहेत. त्यांचें स्वतंत्र राष्ट्रीय अस्तित्व मात्र अंतर्गत एकीवर अवलंबून आहे.

बेकारांस देकार

लक्षावधि बेकार पुरुषांस आणि स्त्रियांस द्रव्यसहाय देण्याची व्यवस्था ग्रेट ब्रिटनमध्यें करण्यांत आली असून लोकांस तिचा प्रत्यक्ष फायदा मिळत आहे. काम करण्याच्या स्थितींत असलेल्या स्त्री-पुरुषांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी त्या देशांत सरकारनें पत्करली आहे आणि ह्या कामीं कोट्यवधि रुपये प्रतिवर्षी खर्चले जात आहेत. हीं बेकार माणसें कामावर असलीं तर त्यांस मिळण्यासारख्या मजुरीपेक्षां सरकारी सहाय कमी असतें, ही गोष्ट खरी; परंतु कामावर जाण्याच्या संबंधांतला त्यांचा खर्चहि वांचतो. बेकारांस द्यावयाच्या सहायाची व्यवस्था एका बोर्डाकडे सोपवलेली आहे. त्याच्या वृत्तांतावरून असें दिसून येतें कीं घरीं बसल्या मिळणाऱ्या सरकारी देकारामुळें त्यांची काम करण्याची संवय आणि इच्छा नष्ट होत चालली आहे. काम शोधण्याची दगदग करण्यापेक्षा मिळत आहे ती मदत घेऊन पडून रहावें अशी प्रवृत्ति अनेक बेकारांमध्यें दिसून येत आहे. तिला कसा आळा घालावा हा प्रश्न अत्यंत अवघड झालेला आहे. बेकारी मोठ्या प्रमाणावर कायमचीच होऊन बसल्यास काय करावें ह्याची विवंचना ब्रिटिश राष्ट्रास लागली आहे. परराष्ट्रीय व्यापारावर त्याची सर्व मदार आहे आणि त्यांत सुधारणा होण्याचीं चिन्हें तर दिसत नाहींत, अशी आजची अवस्था आहे.

मराठी केंद्र संस्था, पुणें

श्री. यंव ह्यांनीं स्थापन केलेल्या आजि मोठ्या उत्साहानें आणि परिश्रमानें भरभराटीस आणलेल्या वरील संस्थेचें चालू वर्षाचें माहितीपत्रक प्रसिद्ध झालें आहे, त्यांत प्रथम अनेक पुढाऱ्यांचे संस्थेविषयीं अभिप्राय छापले असून संस्थेच्या शिक्षक-वर्गाचा परिचय करून देण्यांत आला आहे. संस्थेविषयीं आणि अभ्यासक्रमाविषयीं माहिती दिली आहे, तीवरून संस्थेच्या व्यापाची कल्पना येते. शेवटीं संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचे अभिप्राय जोडले आहेत. मराठी केंद्र संस्थेच्या उपयुक्त कार्याचा प्रचार विस्तृत होण्यास प्रस्तुत माहिती पुस्तक उपयोगी पडेल, अशी दृढ आशा आहे.

दि बँक ऑफ इंडिया, लि.

दि बँक ऑफ इंडिया लि. चे जून, १९३८ अखेरचे हिशेब पुरे झाले आहेत. वर्षाच्या पहिल्या सहामाहीचे व्यवहारांत बँकेस १२ लक्ष, ९५ हजार रुपये नफा झाला, त्यांतून इनकम टॅक्स व सुपरटॅक्स ह्यांकरितां १½ लक्ष रुपये वजा केले म्हणजे ११ लक्ष, ४५ हजारांचा निवळ नफा उरतो. त्यांत मागील हिशेबांतील ७ लक्ष, ६५ हजार रुपये मिळविले, म्हणजे एकूण बेरीज १९ लक्ष, १० हजार रुपये होते. त्यांतून पहिल्या सहामाहीकरितां भागीदारांस १० टक्के दरानें (भागास २½ रु.) करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ५ लक्ष रुपयांचा विनियोग करण्यांत आला असून उरलेले १४, ०९, ६५० रु. १ आ. २ पै पुढील हिशेबांत ओढण्यांत आले आहेत.

बँक ऑफ इंडियाचा प्रत्येक भाग १०० रुपयांचा असून त्यांतील निम्में भांडवल वसूल केलेलें आहे. भागांची संख्या २ लक्ष व भांडवल १ कोटि रुपये आहे.

त्रावणकोर बँकेचा कारभार—चौकशीस प्रारंभ

त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँकेच्या कारभारासंबंधीं चौकशी करण्याचें काम रिझर्व्ह बँकेनें स्वीकारलें आहे, त्या प्रीत्यर्थ येणारा सर्व खर्च रिझर्व्ह बँकच सोसणार आहे. इंपीरियल बँकेचे एक माजी अधिकारी व सध्या रिझर्व्ह बँकेंत काम करीत असलेले श्री. शिवशंकरन् ह्यांची नेमणूक वरील कामासाठी करण्यांत आली असून त्यांनीं मद्रास येथें चौकशीचे कामास प्रारंभहि केला आहे.

तोटयांत चालणारे रेल्वेचे फाटे

रेल्वेजचे कोणकोणते फाटे तोटयांत आहेत, ह्यासंबंधीं वेगवेगळया रेल्वेजकडून हिंदी रेल्वेबोर्डानें माहिती मागविली आहे. मोटारींच्या अनिष्ट स्पर्धेमुळें तोटयांत चालणारे फाटे बंद करण्याच्या योजनेची ही पूर्वतयारी आहे काय ?

प्रो. काळे यांचीं सोलापूर येथील व्याख्यानें

मंगळवार, ता. १२ रोजीं, प्रो. वा. गो. काळे ह्यांचें सोलापूर येथें, रोटरी क्लबापुढें " व्यापार आणि जकाती " ह्या विषयावर व्याख्यान झालें. बुधवार ता. १३ रोजीं त्यांचें सार्वजनिक व्याख्यान होणार आहे. त्यांच्या हस्तें एका स्टडी सर्कलचेंहि उद्घाटन होणार आहे.

Poona School of Commerce

(Estd. 1925)

HIGHER COURSES ACCOUNTANCY (A. C. R. A.), SECRETARIAL (A. C. C. S.). Matriculates admitted. AUDITING (R. A. first examination) for Graduates, and LONDON UNIVERSITY INTERCOM. Exam. Graduates and Intermediates admitted.

Best staff, fees moderate and excellent results. Session from 16th July, 1938. Write to :

G. M. Oka.
R. A., G. D. A., F. R. E. S. (Lond.)
Principal.

180 Budhwar, : : POONA 2.

सप्टेंबर १९३८ मध्यें

बक्षिसवांटणी

हिंद बेनिफिट बाँड

किं. रु. १०—८ फक्त.

आजच बाँड विकत घ्या.

रु. ५००० चें

बक्षीस मिळवा.

एजन्सीकरितां आजच लिहा.

वि. वा. परांजपे, मॅनेजिंग डायरेक्टर.
हिंद बेनिफिट सोसायटी लि., पुणें.

कित्येकांचीं पत्रें—

बाँड खरेदीची तारीख उलटल्यावर आमचा बाँड अर्ज स्वीकारावा व येत्या बक्षीस वांटणींत तो धरावा अशा आशयाचीं कित्येकांचीं पत्रें यावयाचीं हा गेल्या सालचा अनुभव यंदाही आला. अशांची निराशा होऊं नये म्हणून बाँड खरेदीची ता. १५-७-३८ करण्यांत आलेली आहे तरी आमचे ग्राहक या वाढत्या मुदतीचा फायदा घेतील अशी आशा आहे.

दुसरी बक्षीस वांटणी ता. ३१-७-३८ रोजीं होईल.

स्पेशल ऑर्गनायझरः—टी. आर. अभंग, सातारा सिटी.
एजंटः—शंकर हरी साठे, मोटार स्टँड-सातारा.
महाराष्ट्र इन्शुअरन्स कंपनी लि. कऱ्हाड (सातारा).

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

कारखान्यांच्या एकत्रीकरणाची व संघटनेची आवश्यकता

"सध्याच्या स्पर्धेच्या काळांत, उद्योगधंद्यांच्या एकीकरणावांचून निभाव लागणें कठीण आहे. चालू कारखान्यांची संख्या कमी आणि स्पर्धाकारक नवीन कारखाने स्थापन होण्याची शक्यता अत्यल्प असल्याखेरीज औद्योगिक प्रगति होणार नाहीं. पुरेशी यंत्रसामुग्री व तज्ञ अधिकारी ह्यांची आयात करण्यास आवश्यक तेवढें भांडवल असून भागणार नाहीं. पाश्चात्य देशांतील उद्योगधंद्याच्या वाढीचें स्वरूप व त्याचें महत्त्व हिंदी लोकांनीं समजून घेणें जरूर आहे. मरहूम एफ. ई. दिनशा ह्यांचा उपक्रम त्यांनीं नजरेसमोर ठेवला पाहिजे. धंद्यांचें असें संघटन करून नफ्याचें प्रमाण मर्यादेंत राखलें, म्हणजे नवीन कारखाने भरमसाट रीतीनें स्थापन होण्याची भीतिच उरणार नाहीं."
—डॉ. नेमेन्यी ह्यांच्या, कलकत्ता येथील रोटरी क्लबापुढील भाषणांतील उतारा.

एवढी संपत्ती कशी खर्चणार !

विक्षिप्त स्वभावाच्या एका कॅनेडिअन गृहस्थानें दहा लक्ष रुपयांची रकम, दहा वर्षांत जिला अधिकांत अधिक मुलें होतील अशा स्त्रीस बक्षीस देण्याची व्यवस्था केली होती. चार स्त्रियांमध्यें ही रकम आतां वांटण्यांत आली असून अचानक मिळालेले हे अडीच लक्ष रुपये कसे खर्चावे असें प्रत्येकीस झालें आहे. त्यांस ह्या कामीं सल्ला आणि सहाय देणाऱ्या स्त्रियांच्या लोकांची गर्दी उसळली असून त्यांनीं भांबावून गेलेल्या स्त्रियांच्या घरास वेढा घातला आहे. त्यांस चुकवण्यासाठी एक स्त्री आपलीं बारा मुलें शहरांतून घेऊन निसटली आहे. इतरांस फुकट सल्लागारांनीं घेरलें आहे.

कागदाच्या धंद्याचें संरक्षण कमी होणार

तयार कागद आणि कागद तयार करण्यास लागणारा रांधा ह्यांच्या हिंदुस्थानांतील आयातीवर संरक्षक जकात आहे. ह्या जकातीचेवर उत्पन्नाची आणखी एक पट्टी सरकारनें बसविलेली आहे, त्यामुळें जकातींपासून हिंदी कागदाचे धंद्यास मिळणाऱ्या संरक्षणांत वाढ झालेली आहे. आयात होणाऱ्या कागदाचे सध्याचे भाव लक्ष्यांत घेतां, ह्या पट्टीची आतां हिंदी धंद्याचे संरक्षणासाठी आवश्यकता नाहीं, असा टारिफ बोर्डानें अभिप्राय दिला, तो सरकारनें मान्य करून त्याप्रमाणें हुकूम सोडला आहे. १९३६-३७ सालांतील कागदाचें ज्यांचें उत्पादन एकूण हिंदी उत्पादनाच्या ८९ टक्क्यांइतकें भरलें, अशा तीन प्रमुख कारखान्यांस ही पट्टी आवश्यक वाटत नाहीं; तथापि नव्यानेंच स्थापन झालेल्या कंपन्यांस अर्थातच संरक्षणांतील ही घट जाचक होईल.

संरक्षक भिंतीआड नफेबाजी

पोलादी कामासाठीं टेंडरें मागविलीं असतां, सर्वांकडून एकाच रकमेचीं टेंडरें येतात, असा अनुभव ग्रेट ब्रिटनमधील अनेक म्युनिसिपालट्यांस येऊं लागला आहे. पोलादाच्या धंद्यांतील लोक संरक्षक जकातींचा फायदा घेऊन आणि अंतर्गत स्पर्धा थांबवून मालाची किंमत वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न करीत आहेत. बर्मिंगहॅम सिटी कौन्सिलनें, जरूर तर ब्रिटिशेतर पोलाद घेऊन, ही फळी मोडण्याचा आपला निश्चय नुकताच जाहीर केला. एका वीज कंपनीनें टेंडरें मागविण्याच्या जाहिरातींवर चार हजार रुपये खर्च केले. हेतु हा कीं, कमींत कमी दरांत आपलें काम व्हावें. तिचेकडे आलेलीं सर्व टेंडरें एकाच दराचीं असलेलीं आढळलीं !

अप-टु-डेट शिलाई करतां

महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

पराडकर टेलर्स ॲकॅडेमी

(सिटी पोस्टासमोर पुणें २)

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

आकडेशास्त्रज्ञांचें समाधान झालें !

आंकडेशास्त्रज्ञांनीं सर्व तऱ्हेनें हिशेब करून अखेर हीच पॉलिसी पसंत केली.

भरलेल्या हप्त्यावर शेंकडा ९ टक्के व्याज मिळून नफा व नगद ४०० रुपये प्रत्येक हजाराच्या पॉलिसीस देण्यांत येतात.

माहिती मागवा.

दि युनिव्हर्सल विमा कं. लि. चे महाराष्ट्राचे मुख्य एजंट्स : एम्. सूर्यराव ॲन्ड कं., लक्ष्मी रोड, पुणें २

कातडें कमविण्याची क्रोम पद्धति

कटकत्ता येथील कॉटेज ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे बाबू सतीशचंद्र दासगुप्त ह्यांनी " खेड्याकरितां कातडें कमविण्याची क्रोम पद्धति" हें पुस्तक इंग्रजीमध्यें लिहून प्रसिद्ध केलें. त्याचें प्रस्तुत पुस्तक हें मराठी भाषांतर होय. अनुवादाचें काम श्री. बा. र. देशपांडे (खादी भांडार, जळगांव) ह्यांनी केलें असून अखिल भारतीय ग्रामोद्योग संघानें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. अशाच प्रकारचीं गुजराती व कानडी भाषांतरेंहि करण्यांत आलीं आहेत. खेड्यापाड्यांतून चामडी कमविण्याचा धंदा करणाऱ्या मनुष्यास स्वभाषेंत आतां उपयुक्त माहिती उपलब्ध झाली आहे, त्यामुळें त्यास आपल्या धंद्यांत सुधारणा करण्यास उत्कृष्ट सहाय होईल.

कातडें कमविण्याच्या क्रिया कमी अवधींत पूर्ण करणें क्रोम पद्धतीनें शक्य झालें आहे. ह्या पद्धतीनें कमविलेलें कातडें नरम व लवचिक होतें आणि तें चांगलें टिकतें. ही पद्धत हिंदी कातड्याच्या कारखान्यांत दृढमूल झाली असली, तरी खेड्यापाड्यांत तिचा अद्याप प्रवेश झालेला नाहीं. गरीब चांभारांस क्रोम पद्धति अवगत होऊन तिचा त्यांनीं अवलंब केला, तर त्यांचा उद्योगधंदा सुधारून त्यांस पैसाहि चांगला मिळूं शकेल. मोठ्या कारखान्यांतील कातड्याइतकें चांगलें कातडें खेडेगांवांतहि तयार होण्यास अडचण येणार नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. खेडेगांवांत उत्कृष्ट कातडें तयार होऊं लागलें, म्हणजे पक्क्या कातड्याची आपली गरज स्वदेशांतच भागूं शकेल आणि एका महत्त्वाच्या ग्रामोद्योगाचें पुनरुज्जीवन होईल. " कातडें कमविण्याची क्रोम पद्धति " ह्या पुस्तकांत क्रोमपकाईच्या क्रियांची तपशीलवार आणि दिवसवार माहिती दिली आहे, त्यामुळें ह्या धंद्यांतील लोकांस सशास्त्र आणि व्यावहारिक ज्ञान उपलब्ध होण्याची फार मोठी सोय झाली आहे. पुस्तकांत चार चित्रेंहि दिलेलीं आहेत. ह्या अत्यंत व्यवहारोपयोगी पुस्तकाच्या प्रती श्री. वैकुंठराय मेहता, सभासद, व्यवस्थापक मंडळ, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ, C/o पोस्ट बॉक्स नं. ४७२, मुंबई, ह्या पत्त्यावर मिळूं शकतील. घाऊक खरेदी करणारांस सवलत मिळेल.

सेंट जॉर्जस हॉस्पिटल बंद होणार

मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटलांतील रुग्णांची रोजची सरासरी ३५६.६ असते आणि त्या इस्पितळास सालिना ४ लक्ष, २ हजार रुपये खर्च येतो. सेंट जॉर्जेस हॉस्पिटलांतील रोजच्या ११८.६ रुग्णांवर दरसाल ४ लक्ष, ८४ हजार रुपये खर्च होतो, त्यापैकीं १½ लक्ष रुपये मुंबई सरकार देतें. हें हास्पितळ बंद करून जे. जे. मधील रुग्णांची संख्या वाढविण्याचें सरकारनें ठरविलें आहे. सेंट जॉर्जेसमध्यें मुख्यतः युरोपियन रहाणीचे लोकच जात असत.

काम जबाबदारीचें परंतु पगार अपुरा

" ज्यांच्या अंगावर जबाबदारीचीं कामें सोपविण्यांत येतात, अशा नोकरांस पुरेसें वेतन देण्याची हिंदी व्यापाऱ्यांनीं व्यवस्था करणें आवश्यक आहे. माझ्या पुढील ह्या खटल्यांतील आरोपीकडे बिलांच्या वसुलीचें काम आहे. त्यास ४५ रुपये दरमहा पगार मिळतो, तो पुरेसा आहे असें मला वाटत नाहीं. परवां एकानें आपल्या मालकास १,२१,००० रुपयांस बुडविलें. त्या नोकराचा पगार ६० रुपये होता. अशा नोकरांस पुरेसा पगार मिळणें आवश्यक आहे."

—चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

कॉमनवेल्थ विमा कंपनी

लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

Last year 1936-37
Exceeds
2 CRORES & 82 LAKHS

BONUS

PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

(ESTD. 1907)

Branches : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
Offices : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

सहकारी चळवळ

सटाणा ट्रेनिंग क्लासचा समारोप समारंभ

सटाणा (जि. नासिक) येथें ता. ३०-६-१९३८ रोजीं सेक्रेटरीच्या ट्रेनिंग क्लासचा समारोप समारंभ राव बहादुर आर. व्ही. वंडेकर यांच्या हस्तें साजरा करण्यांत आला. आरंभीं श्री. आर. एम. तळपदे, मुंबई प्रां. को. इन्स्टिटयूटचे एक अंमलदार, यांचें भाषण झालें. आपल्या भाषणांत ते म्हणाले, "सध्या इन्स्टिटयूटच्या भवितव्यासंबंधीं चोहोंकडे चर्चा चालू आहे व कित्येकांचा असा समज झालेला दिसतो कीं, आतां इन्स्टिटयूट नाहींशी होणार आहे. पण खरा प्रकार असा नाहीं. इन्स्टिटयूट अस्तित्वांत पुढेंहि राहील. फक्त तिची घटना बदलण्याचें काम चालू आहे. रॉयल कमिशननें आपल्या रिपोर्टांत सहकारी कार्यकर्त्यांना शिक्षण देण्याचे प्रश्नावर फारच जोर दिला आहे. यावरून सहकारी चळवळींत शिक्षण देण्याची किती जरूरी आहे हें आतां नव्यानें कोणास सांगण्याची जरूरी आहे असें मला वाटत नाहीं. इन्स्टिटयूट जरी समजा उद्यां नाहींशी झाली तरी शिक्षणाचें कार्य हें पुढें करावेंच लागणार आहे व तें कार्य करण्यास जोंपर्यंत दुसरी कार्यक्षम संस्था अस्तित्वांत येणार नाहीं तोंपर्यंत तें कार्य इन्स्टिटयूटलाच करावें लागणार आहे. यामुळें इन्स्टिटयूट नाहींशी करून आज भागण्यासारखें नाहीं. तरी कोणीहि इन्स्टिटयूटबद्दल गैरसमज करून घेऊं नये व पूर्वींप्रमाणें आपली सहानुभूति चालू ठेवावी अशी माझी विनंति आहे." त्यानंतर श्री. धर्मा तानाजी पाटील यांचें भाषण झालें. ते म्हणाले:-"शेतकरी वर्ग जागा होऊन जरा वर येऊन बसूं लागला कीं लगेच सत्तेचें गाठोडें वरच्या मजल्यावर नेऊन ठेवण्यांत येतें. कॉंग्रेसच्या राजवटींत तरी लोकशाहीच्या तत्त्वाचा खून होऊन असें केलें जाणार नाहीं अशी जी जनतेची अपेक्षा होती तीहि फोल ठरते कीं काय व या राजवटींत लोकशाहीचें निर्मूलन होऊन हिटलरशाही सुरु होते कीं काय अशी साधार भीति वाटूं लागली आहे. तरी कॉंग्रेस सरकारनें खरी लोकशाही जितकी व्यापक करतां येईल तितकी करावी व तिचा संबंध खेड्यांतील शेतकऱ्यांशी येऊन पोहोचेल अशी योजना आखावी अशी माझी सूचना आहे." यानंतर श्री. गोपाळराव देसाई यांनीं सेक्रेटरींना त्यांच्या कर्तव्याबद्दल कळकळीचा उपदेश केल्यानंतर अध्यक्ष रावबहादुर वंडेकर यांचें भाषण झालें. शेवटीं पानसुपारी व अल्पाहार होऊन समारंभ समाप्त झाला.

रात्रीं स्थानिक सहकारी पुढारी व कार्यकर्ते यांचें सहकारी भोजन झालें व त्यायोगें सर्वांत एक प्रकारचा नवीन उत्साह उत्पन्न झाला. या सहकारी भोजनसमारंभांत सर्वांनीं भाग घेतल्यामुळें खऱ्या सहकार्याचें कृतींत उतरलेलें एक प्रत्यंतरच पहावयास मिळालें.

पुरंदर तालुका शेतकी सुधारणा संघ, सासवड

पुरंदर तालुका शेतकी सुधारणा संघाची वार्षिक साधारण सभा ता. १८-७-३८ रोजीं सोमवारीं दुपारीं ३ वाजतां, सासवड माळी सभागृहामध्यें श्री. आमदार बापूसाहेब काटे, एम्. एल. ए., मेंबर, डेक्कन डिव्हिजनल बोर्ड ऑफ ॲग्रिकल्चर, पुणें, यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

खेड व जुन्नर ता. को. सुपरवायझिंग यूनियन लि.

सेक्रेटरींचा उजळणी वर्ग आणि रिफ्रेशर क्लास

तारीख १ ते ४ जून, १९३८ पर्यंत खेड येथें सुपरवायझिंग यूनियनचे ऑफिसांत यूनियनचे भागांतील सर्व सेक्रेटरी व ग्रुप सेक्रेटरी ह्यांस कामाची प्रत्यक्ष माहिती देण्यांत आली. ता. २ रोजीं श्री. शिवराम रामजी पाटील गुंजाळ, यूनियन प्रेसिडेंट, यांचे अध्यक्षतेखालीं लँड मॉर्गेज बँकेचे कामाविषयीं व व्यवहाराविषयीं लँड व्हॅल्युएशन ऑफिसर व मॅनेजर, लँड मार्गेज बँक पुणें, यांनीं संपूर्ण माहिती सांगितली. पुणें जिल्हा इन्स्टिटयूटचे प्रोपागँडा ऑफिसर यांनींहि सदर वेळीं सोसायट्यांचे कामकाजाबद्दल थोडक्यांत माहिती दिली. चालू असलेले सवलतींबद्दल आढावा घेऊन व्यक्तिशः सवलतीचे योजनेबाबतहि त्यावेळीं पूर्ण चर्चा करण्यांत आली. सदर क्लासचे वेळीं यूनियनचे भागांतील सर्व सेक्रेटरी हजर होते, त्यामुळें या रिफ्रेशर क्लासचा बराच उपयोग झाला.

सर्क्युलरें एकत्र छापून प्रसिद्ध करा

"सहकारी खात्यांत काम करीत असलेल्या जुन्या व नव्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाच्या सोयीसाठी व माहितीकरतां काढलेलीं, सहकारी खातें व बँक यांचीं सर्क्युलरें एकत्र क्रमवार व सालवार पहावयास मिळत नाहींत म्हणून फार अडचण होते. ह्यासाठी मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचीं आणि रजिस्ट्रार व असिस्टंट रजिस्ट्रार ह्यांचीं सुरवातीपासूनचीं महत्त्वाचीं सर्क्युलरें व रिव्हाइज्ड केलेलीं सर्व हस्तपत्रकें एकत्र पुस्तकरूपानें छापून त्याच्या प्रती खातें, बँका, यूनियन्स व इन्स्टिटयूट यांतील काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना फुकट पुरविण्याची लवकर तजवीज झाल्यास सोयीचें होईल" अशी सूचना सटाणा ता. को. सु. यूनियनचे अध्यक्ष, श्री. धर्माजी तानाजी पाटील, ह्यांनीं रजिस्ट्रार व प्रांतिक बँक ह्यांस केली आहे.

ब्रिटिश सहकारी चळवळ

ब्रिटिश सहकारी संस्थांची वार्षिक परिषद् नुकतीच भरली होती, तिला दोन हजार प्रतिनिधि उपस्थित होते. त्यांच्या कार्यकर्त्यांनीं सहकारी चळवळीसाठी एक संशोधन खातें स्थापिलें असून त्याच्यामार्फत किरकोळ मालविक्रीबाबत चौकशी करविली आहे. चळवळीचा विस्तार आणि सभासदांच्या संख्येंत वाढ होऊनहि त्यामानानें किरकोळ सहकारी विक्रीच्या व्यवहारांत वाढ झालेली नाहीं असें तीमध्यें आढळून आलें आहे. विक्रीच्या लहान सहकारी संस्था फायदेशीर रीतीनें चालत नसल्यानें त्यांपैकीं कित्येकांचें एकीकरण व्हावें लागेल असें दिसतें. सहकारी दुकानांची संख्या ग्रेटब्रिटनमध्यें चोवीस हजार आहे. असल्या दुकानांची एकूण संख्या साडेसात लाख आहे.

विमा कंपनीविरुद्ध निर्णय

नवसरी जिल्ह्यांतील सोनगड येथील इच्छा बाई ह्या विधवा स्त्रीनें, आपल्या पतीनें एशियन कंपनींत उतरविलेल्या विम्याची रकम मिळण्याविषयीं दावा ठावला असतां सब जज्जानें ती देण्याविषयीं हुकूम केला. कंपनीनें डिस्ट्रिक्ट जज्जाकडे अपील केलें, परंतु तें अयशस्वी झालें. इच्छा बाईच्या पतीचा २ हजारांचा विमा होता. विमेदारानें आपली प्लीहा वाढली असल्याचें सांगितलें असतें तर कंपनीनें त्याचा विमा स्वीकारला नसता, असें कंपनीतर्फे सांगण्यांत आलें. जज्जानें हें म्हणणें मान्य केलें नाहीं व वैद्यकीय पुराव्यावर टीका केली आणि वादीचे बाजूनें निकाल दिला.

वेस्टर्न इंडिया कंपनीची वार्षिक सभा

(ता. २६-६-३८)

अध्यक्ष, श्री. अण्णासाहेब आपटे, ह्यांच्या भाषणांतील उतारे

(२)

कंपनीच्या प्रगतीसंबंधीं आकडेवार माहिती देऊन अध्यक्षांनीं नवीन उपक्रमांची हकीकत सांगितली. नंतर ते म्हणाले:—

मुख्य कचेरीची नवी इमारत

येथील हेड ऑफिसकरितां दोन वर्षांपूर्वी बांधलेली इमारत ऑफिसच्या वाढत्या गरजा भागविणेस अपुरी पडूं लागल्यामुळें सदर इमारतीचे मागील बाजूस पश्चिमाभिमुखी आणखी एक तसाच ब्लॉक बांधण्याचें काम हल्लीं सुरू असून सदरहू इमारत आणखी सुमारें २–३ महिन्यांत पुरी होईल. या इमारतीस सुमारें २५,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

कामाचा प्रसार

कंपनीच्या कामाचा प्रसार अधिक विस्तृत पायावर करण्याचें काम चिकाटीनें चालू आहे. अहवालाचे सालाचे पूर्वी इंदूर व हैदराबाद या ठिकाणीं ऑर्गनायझिंग ऑफिसें अस्तित्वांत आलेलीं होतीं. चालू सालीं कोल्हापूर येथें असेंच ऑर्गनायझिंग ऑफिस उघडून दक्षिणेंतील संस्थानांतून कामाचा अधिक प्रसार करण्याची खटपट चालू आहे. या सर्व ऑफिसांमार्फत समाधानकारक काम येऊं लागलें आहे.

इनकम टॅक्स बिल

इनकम टॅक्सच्या कायद्यांत दुरुस्ती करण्याचें बिल वरिष्ठ कायदे-मंडळांत सध्यां आलें आहे व तें सिलेक्ट कमिटीकडे गेलें आहे. विमा कंपन्यांकडून जो इनकम टॅक्स घेण्यांत येतो ती पद्धत अत्यंत अन्यायाची आहे. मूल्यमापनांत जा सरप्लस रकम दिसते तीवर सरकार ही आकारणी करतें. परंतु या सरप्लसपैकीं बराच मोठा भाग बोनसच्या रूपानें विमेदारांमध्यें वांटण्यांत येतो. याचा सरकार कांहींच विचार करीत नाहीं. इंग्लंडमध्यें विमा कंपन्यांकडून ज्या तऱ्हेनें कर घेतात तेंच तत्त्व हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांना लागू करावें अशी येथील सर्व विमा कंपन्यांची मागणी आहे. सध्याच्या पद्धतीमुळें पर्यायानें विमेदारांचेंहि नुकसान आहे. तरी सदर बिल पास होण्यापूर्वी सर्वांनीं मिळून हा प्रश्न धसास लावल्याशिवाय भागणार नाहीं. तरी सदरबाबत जरूर ते सर्व प्रयत्न करणें अवश्य आहे असें वाटतें.

शेकडा ५५ टक्के मालमत्ता सरकारी रोख्यांत ठेवण्याची सक्ती

नवीन विमा कायद्यांतील कलम २७ मध्यें अशी योजना आहे कीं, विमा कंपनीच्या मालमत्तेचा शेकडा ५५ इतका भाग कंपनीनें सरकारी आणि विमा कायद्यानें मान्य ठरविलेल्या (approved) सिक्युरिटीजमध्येंच गुंतविला पाहिजे. हें कलम असेंच कायम राहिल्यास विमा कंपन्यांना आज मिळत असलेला अल्प व्याजाचा दरहि घटत जाईल व त्यामुळें बोनसचे दरहि बरेच कमी करावे लागतील असा त्याचा पर्यायानें अनिष्ट परिणाम होणार आहे. विमेदारांचे हिताचे दृष्टीनें विचार करतां नवीन विमा कायद्यांतील हें कलम शक्य तितक्या लवकर दुरुस्त होण्याबद्दल जोराची खटपट करणें जरूर आहे.

नवीन कायद्याचीं इतर बंधनें

इतर बाबतींत नवीन विमा कायद्यानें केलेल्या सुधारणा विमा कंपन्यांचा कारभार योग्य मार्गानें चालविण्याचे दृष्टीनें योग्य अशाच आहेत व या कायद्यानें ज्या गोष्टींवर विशेष नियंत्रण घातलें आहे (मॅनेजिंग एजन्सीची पद्धत, विमेदारांचें डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधित्व इ.) त्या दृष्टीनें विचार करतां आपल्या कंपनीनें सदर नियंत्रणें आपणहून प्रथमपासूनच घालून घेतलीं असल्यामुळें सदर कायद्यानें आपले कंपनीवर कोणतेंच नवीन बंधन बसत नाहीं. इतर बाबतींतहि कंपनीचे नियमांत जरूर ते फेरफार करण्याबद्दलची व नवीन माहितीपत्रकांत त्याचा अंतर्भाव करणेची अवश्य ती तजवीज लवकरच होईल. एजंटांना भरमसाट कमिशन देण्याच्या संबंधांत नवीन कायद्यानें निर्बंध घातला आहे. परंतु सदर दोषापासून आपली कंपनी प्रथमपासूनच विशेष सावध असल्यानें नवीन नियंत्रणाचा कोणत्याच प्रकारचा अनिष्ट परिणाम आपले कंपनीच्या कारभाराचे दृष्टीनें घडून येणार नाहीं. जरी नवीन कायद्यांतील कांहीं कलमें टीकास्पद अशीं असलीं तरी त्यामुळें एकंदरींत विम्याच्या धंद्यांत बरीच सुधारणा होईल अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

रौप्य महोत्सव

१३ ऑगस्ट, १९३८ रोजीं कंपनीच्या स्थापनेस २५ वर्षें पुरीं होतात. परंतु समारंभास अयोग्य असा हा पर्जन्यकाळ असल्यानें व हिशेबाचे दृष्टीनेंहि कंपनीच्या कामकाजाचें २५ वें वर्ष येत्या डिसेंबर १९३८ अखेर पुरें होत असल्यानें कंपनीचा रौप्य महोत्सव १९३९ च्या फेब्रुवारी महिन्यांत करण्याचा डायरेक्टर मंडळींचा विचार आहे. कंपनीचा रौप्य महोत्सव संस्मरणीय व्हावा अशी सर्वांची इच्छा आहे. त्याबाबत काय काय योजना कराव्यात यासंबंधीं हल्लींची डायरेक्टर मंडळी विचार करीत आहेतच. तथापि कंपनीचे भागीदार, एजंट, विमेदार व हितचिंतक यांनींहि सर्व प्रकारें मदत करून हातभार लावल्यास सदर कार्य सुलभ व अपेक्षेप्रमाणें संस्मरणीय असें होणार आहे. तरी सर्वांच्या सहानुभूतीची मी मनापासून अपेक्षा करतों. रौप्य महोत्सवाचे सालीं कंपनीच्या नवीन कामाची वाढ, एक कोटीपर्यंत व्हावी अशी डायरेक्टरांची इच्छा आहे.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून)	३%

सरकारी कर्जरोखे

५% करमाफ लोन (१९४५–५५) … …	११७–१४
५% (१९३९–४४) लोन … … …	१०३—७
४% १९४३ … … … …	१०८—६
३½% बिनमुदत … … … …	९८–१४
३½% १९४७–५० … … …	१०६—४
२¾% १९४८–५२ … … …	१००—५

निमसरकारी रोखे

४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) …	११०-१२
४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) … …	१०९-१२
४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत)	१०९—४
४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) … ..	११२—४
५% म्हैसूर कर्ज (१९५५) … …	१२४—४

मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

बँका

बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% … …	१४१—८
बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% … …	१११—०
सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% …	३१—४
इंपीरिअल बँक (५००) १२% … …	१५८५—०
बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ६% … …	६०—०
रिझर्व्ह बँक (१००) ३½% … …	११७—०

रेल्वेज

दौंड–बारामती (१००) ४½% … …	१०२—०
पाचोरा–जामनेर (१००) ४½% … …	९६—४
अहमदाबाद प्रांतज (५००) १२½%	९६०—०
तापी व्हॅली (५००) ७½% … … …	७३१–४

वीज

बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% … …	१२३—८
कराची (१००) ९% … … …	२१०—०
पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% … …	१९६—४
टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% … …	१४२२—८
आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% … …	१४९०—०

इतर

बेलापूर शुगर (५०) ७ रु. … … …	१५९—०
इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. … …	४०—०
शिंदिया स्टीम (१५) १ रु. … … …	२०—४
न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. …	४८—०
ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. …	४१८०—०
टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% … …	२१०—०
टाटा आयर्न दु. प्रे. (२००) १५ रु. २ आ. …	१७१–१२
टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १० रु. … …	२५०—०
टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु. ३ आ. ६ पै …	११३५—०

सोनें–चांदी

सोनें (मिंट) दर तोळ्याचा … …	३५–७–०
चांदी (मिंट) दर १०० तोळ्यांचा … …	५०—४

६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या नवीन योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

दि प्रॉव्हिन्शिअल बँक
ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (मी. प्रेंड. रेल्वे स्टेशन) **बंगलूर**

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशीक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, कोल्हापूर, सुरत.

अध्यक्ष : **खानसाहेब हाजी अहमद कासम** अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : **अेस्. पी. ठाकर.**

करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनी चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशी चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. त्या-संबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यत: विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाच यादीवरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. थुरर्गी. विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकाली गर्भपात, होणें दुखणें शौच्यास साफ न होणें, इत्यादि. विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डि. नं. ६)
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[माहितीपत्रक मागवा]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
संगीत-मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.

गायन	हार्मोनियम	दिलरुबा	फिडल
किं. ६ आ.	किं. २॥ रु.	किं. १ रु. २ आ.	किं. १ रु. ४ आ.

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा
मोती चौक : : : सातारा

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोप्लेन प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

'अभिनंदनीय प्रगति' असेंच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वीं आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

धी बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना— ७ सप्टेंबर १९०६]

उभारलेलें भांडवल	... ... रु.	२,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	... ... रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	... ... रु.	१,०५,५०,०००

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

शाखा—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रे (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), कुलाबा (मुंबई), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— **टी. आर. लालवाणी.**

The Co-operators' Book Depot.
9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
Specialising in
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

INDUSTRIAL SOCIETY
WORK SHOP
Furniture on Hire on Reasonable Terms
Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time.
Old Furniture also can be bought or sold on commission.
SHEVAK BROS 3 Kasba, POONA Near Ganpati Temple
Branch No. 1—Fergusson Road.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.